DR. G. D. POL FOUNDATION
Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE - HOSPITAL
Institutional Area, Sector - 4, Kharghar, Navi Mumbai - 410 210.

Off Tel. No. : 022-27745439
Principal Tel. No. : 022-27744409

E-mail : ymthmc@gmail.com
Website : www.gdpfymthmc.org

Ref. No. YHMC/UG /

Date : / /20

| | | |
|---|---|---|
| 10 | **Hostel Facility**<br>• Details of Rector/Warden<br>Mr.Praful Karande<br>Mrs.Swati Karande<br>• Hostel for Boys and details of accommodation (Own/~~Rental~~)<br>• Hostel for Girls and details of accommodation (Own/~~Rental~~) | Yes/~~No~~ |

Institute has own hostel facility for boys and girls. Intake capacity for boys is 40 and for girls 40. Hostel building is situated at Belpada, Kharghar, Navi Mumbai

Aqua purified drinking water is available 24X7 security services is available

Hostel is Monitored under the supervision of Rector-Mr. Praful Karande and Warden- Mrs. Swati Karande

Y.M.T. HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
KHARGHAR

pppage
Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210

एक सौ रुपये Rs. 100

ONE HUNDRED

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2015 © NR


जिल्हा कोषागार कार्यालय,
ठाणे
19 DEC 2015
मुद्रांक मुख्य लिपीक / लिपीक
19/12/2015

TREASURY OFFICE THANE


## साठेखत

आज दिनांक २१ डिसेंबर २०१५ रोजी वाशी, नवी मुंबई, येथे हे साठेखत खालील पक्षकारांमध्ये करण्यात आले.

श्री. महेंद्र चंद्रकांत भरत, वय ५१ वर्षे, भारतीय सज्ञान, राहणार घर नं. ५४०, बेलपाडा, सेक्टर—३, खारघर, नवी मुंबई. (वरील शब्द समुहात त्यांचे वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक, कायदेशीर प्रतिनिधी आणि मुखत्यार यांचा, जर त्यांचा त्यातून संदर्भ व अर्थ यांना विरोध नसेल तर समावेश होईल) येथे पुढे 'प्रथम पक्षकार/लिहून देणार' म्हणून उल्लेख केला आहे.


Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

आणि

मे. डॉ. जी. डी. पोळ फाऊंडेशन यांचे येरळा मेडिकल कॉलेज (होमिओपॅथीक)तर्फे संचालक श्री. रूषीकेश गजानन पोळ, वय २६ वर्षे, भारतीय सज्ञान, राहाणार सदनिका नं.२४०१, व्रिजन क्रिस्ट, २६वा मजला, ७४६, बाबरेकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई पश्चिम–४०००२८, (वरील शब्द समुहात त्याचे वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक, कायदेशीर प्रतिनिधी आणि मुखत्यार यांचा, जर त्यांचा त्यातून संदर्भ व अर्थ यांस विरोध नसेल तर समावेश होईल) येथे पुढे 'द्वितीय पक्षकार/लिहून घेणार' म्हणून उल्लेख केला आहे.

ज्याअर्थी सदरचे साठेखत हे उभय पक्षकारांमध्ये करण्यात आले:–

ज्याअर्थी: तुकडी व पोट तुकडी पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड सब रजिस्ट्रार साहेब यांच्या क्षेत्रातील व पनवेल महानगर पालिकेच्या हद्दीतील घर नं.५४०, मौजे बेलपाडा, खारघर, नवी मुंबई क्षेत्रफळ ३०० चौ.मी. व या मिळकतीवर बांधण्यात आलेली तळ मजला अधिक चार मजली इमारत व सदर इमारतीमधील १५ सदनिका, या सर्व प्रथम पक्षकार लिहून देणार यांच्या नावे आहे. (येथून पुढे सदर ''मिळकत'' म्हणून उल्लेख केला आहे).

ज्याअर्थी: सदर वर उल्लेख केलेल्या मिळकतीचे श्री. महेंद्र चंद्रकांत घरत हे मालक असून सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष ताबेकब्जात आहे. सदर मिळकतीशी त्यांचे शिवाय दुसरे कोणाचाही हितसंबंध नाही. सदर मिळकत तुकडी व पोट तुकडी पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड पैकी मौजे बेलपाडा, खारघर या गांवी दुय्यम निबंधक पनवेल यांचे हद्दीत आहे.

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

## मिळकतीचे वर्णन

पनवेल महानगर पालिका यांच्या हद्दीतील व दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यक्षेत्रातील घर नं.५४०, मौजे बेलपाडा, खारघर, नवी मुंबई, क्षेत्रफळ २०० चौ.मी. व या मिळकतीवर बांधण्यात आलेली तळ मजला अधिक चार मजली इमारत व सदर इमारतीमधील १५ सदनिका, तालुका पनवेल आणि जिल्हा रायगड, महाराष्ट्र.

आणि ज्याअर्थी: सदर मिळकत प्रथम पक्षकार यांच्या मालकीची असून त्यांनी ती विक्रीस काढली असता व्दितीय पक्षकार यांनी सदर मिळकत पाहिली व पसंत करून खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार सदर मिळकत जशी आहे तशी एकुण मोबदला रू.३,२५,००,०००/— (रूपये तीन कोटी पंचवीस लाख मात्र) घेऊन विकण्याचे प्रथम पक्षकार यांनी व्यक्त केले असता ते व्दितीय पक्षकार यांनी मान्य केले.

आणि ज्याअर्थी: दोन्ही पक्षकारांमध्ये असे ठरले की सदर मिळकत प्रथम पक्षकार यांनी सदर ठरावास अनुसरून व्दितीय पक्षकार यांना कायम स्वरूपी एकुण रक्कम रू.३,२५,००,०००/— (रूपये तीन कोटी पंचवीस लाख मात्र) एवढा मोबदला घेवून विकत देण्याचे मान्य व कबूल केले आहे ते खालिल प्रमाणे:—

अ) व्दितीय पक्षकार यांच्याकडून प्रथम पक्षकार यांस सदर साटेखताप्रमाणे मिळकतीच्या एकुण रकमेपैकी रू.२५,००,०००/— (रूपये पंचवीस लाख मात्र) दिनांक २१/१२/२०१५ रोजी रोख स्वरुपात बयाना रक्कम म्हणून दिलेले आहेत.

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210

आ) तसेच उर्वरीत रक्कम रू.३,००,००,०००/— (रूपये तीन कोटी मात्र) व्दितीय पक्षकार हे प्रथम पक्षकार यांना सदर कराराच्या तारखेपासून प्रत्येक दोन महिन्याला रू.२५,००,०००/— (रूपये पंचवीस लाख मात्र) प्रमाणे पुढिल २४ महिने १२ हप्ते देतील म्हणजेच दिनांक २१.१२.२०१७ पर्यंत देतील.

<u>खालिल प्रमाणे उभयपक्षकारांनी या साठेखताच्या अटी व शर्ती लेखी करण्याचे ठरविले ते येणेप्रमाणे :</u>

१. प्रथम पक्षकार लिहून देणार जाहीर व कबूल करतात की, सदर मिळकत ही त्यांच्या मालकीची असून निर्वेधिक व बोजारहीत आहे. त्यांनी या करारपत्राव्यतीरिक्त इतर कोणतीही व्यक्ती, संस्था, कंपनी व इतर कोणाबरोबरही करारपत्र, गहाणखत, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेकरार, कुलमुखत्यार व इतर कोणत्याही प्रकारे लेखी व तोंडी स्वरूपात सदर मिळकतीचा व्यवहार केलेला नाही.

२. प्रथम पक्षकार कबूल करतात की वरील प्रमाणे मिळकतीची संपुर्ण रक्कम त्यांना मिळाल्यानंतर ते सदर मिळकतीच्या खरेदीखतावर सह्या करतील व सदर मिळकत व्दितीय पक्षकार यांच्या नांवावर हस्तांतरीत करण्यासाठी आवश्यक इतर कागदपत्रांवर सह्या करतील.

३. सदरची मिळकत खरेदीदार यांच्या लाभात हस्तांतर करण्यासाठी प्रथम पक्षकार तलाठी कार्यालय/तहसिल/उपनिबंधक, नोंदणी कार्यालय व इतर सर्व सरकारी दप्तरी हजर राहतील तसेच त्यासाठी आवश्यक लेखी करार करतील व त्यावर सह्या करतील.

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal/Director
Dr. G. D. Pol Foundation's
Y.M.T. Homoeopathic Medical College
P.G. Institute, Kharghar,
Navi Mumbai-410210

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210

४. सदरची मिळकतीचे अभिहस्तांतरण करण्यासाठी ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, तहसिल दप्तरी, नोंदणी कार्यालय व अन्य सरकारी प्राधिकरणाकडून ज्या ज्या प्रकारचे शुल्क, कर आकारले जातील ते सर्व कर व्दितीय पक्षीयकार यांनी भरावयाचे आहेत असे ते कबूल करतात.

५. सदरचा दस्तऐवज झाल्यानंतर प्रथम पक्षकार हे व्दितीय पक्षकार खरेदीदार यांना सदर मिळकतीचे कागदपत्र जसे की अधिकार घरपट्टी, ८ अ चा उतारा, इतर सर्व पावत्या व सदर मिळकतीच्या संबंधीत सर्व मुळ कागदपत्र देतील.

६. सदरच्या मिळकतीचा ताबा दिव्दतीय पक्षकार यांना दिलेल्या तारखेपासून येणारे कर व इतर देणी व्दितीय पक्षकार यांनी अदा करावयाची असून यामागील सर्व देणी व कर असतील ती भरण्याची जबाबदारी प्रथम पक्षकार यांची आहे व राहील. सदरच्या मिळकतीचा उपयोग व्दितीय पक्षकार यांनी त्यांच्या मर्जीप्रमाणे करण्याचा असून त्यांच्यापासून मिळणारे उत्पन्न / फायदे व्दितीय पक्षकार यांचे असतील व त्याची योग्य ती व्यवस्था, विल्हेवाट आपले मर्जीप्रमाणे लावण्याचा अधिकार त्यांना आहे. त्याबाबत प्रथम पक्षकार यांची काही एक हरकत नाही.

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

७. सदरच्या मिळकतीचे खरेदीखत नोंदणीकृत [illegible] पक्षकार यांना त्यांच्या नांवे ग्रामपंचायत [illegible] निबंधक पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड विभागीय कार्यालय उपनिबंधक नोंदणी कार्यालय पनवेल, यांच्या दप्तरी स्वखर्चाने नोंद करून घ्यावयाची आहे. त्याचप्रमाणे [illegible]

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal/Director
Dr. G. D. Pol Foundation's
Y.M.T. Homoeopathic Medical College

सदरच्या मिळकतीबाबत मिळणारे फोटोपास, खाते उतारा, ७-१२ उतारा, आपल्या मालकी करून घ्यायचे आहेत व त्या कामी ज्या ज्या वेळी व ज्या ज्या कागदपत्रांवर, करारांवर प्रथम पक्षकार यांच्या सह्या, आवश्यकता असतील त्या ते समक्ष हजर राहून विनामुल्य देतील व जरूर ते सर्व सहकार्य करतील.

<u>मालमत्तेचे वर्णन</u>

पनवेल महानगर पालिका यांच्या हद्दीतील व दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यक्षेत्रातील घर नं.५४०, मौजे बेलपाडा, खारघर, नवी मुंबई, क्षेत्रफळ २०० चौ.मी. व या मिळकतीवर बांधण्यात आलेली तळ मजला अधिक चार मजली इमारत व सदर इमारतीमधील १५ सदनिका, तालुका पनवेल आणि जिल्हा रायगड, महाराष्ट्र. त्याच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे:—

उत्तरेस :

दक्षिणेस :

पुर्वेस :

पश्चिमेस :

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal/Director
Dr. G. D. Pol Foundation's
Y.M.T. Homoeopathic Medical College
P.G. Institute, Kharghar,
Navi Mumbai-410210

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar
Navi Mumbai-41...

सदरचे साठेखत हे आम्ही आमच्या राजीखुशीने व अक्कलहुशारीने वरिल सर्व उल्लेखित बाबींचा नीटपणे सर्व अर्थ समजून कुठल्याही प्रकारचे अपेय पान अथवा मादक द्रव्य न घेता तसेच मानसिक दृष्ट्या सक्षम असताना स्वाक्षरी करीत आहोत.



प्रथम पक्षीय / लिहून देणार

श्री. महेंद्र चंद्रकांत परत

साक्षीदार :

१.

२.



दुसरे पक्षीय / लिहून घेणार

मे. डॉ. जी. डी. पोळ फाऊंडेशन यांचे

येरला मेडिकल कॉलेज (होमिओपॅथीक)

तर्फे संचालक श्री. रवींद्र गजानन पोळ

साक्षीदार :

१

२

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210.

2-1-12-2016

Vilas Damodar Vichare
B. Sc. LL.B. (Bombay)
Advocate High Court
Office No. GS-4/2.5, 1st Floor,
Sector - 2, Vashi, Navi Mumbai.

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal/Director

# पावती

आम्ही, श्री. महेंद्र चंद्रकांत घरत, प्रथम पक्षकार/लिहून देणार असे कबूल करतो की, वरिल साठेखतप्रमाणे, मला द्वितीय पक्षकार खरेदीदार मे. डॉ. जी. डी. पोळ फाऊंडेशन यांचे येरळा मेडिकल कॉलेज (होमिओपॅथीक) तर्फे संचालक श्री. रूषीकेश गजानन पोळ, यांच्याकडून वर उल्लेखलेल्या मिळकतीच्या मोबदल्याची बयाना रक्कम रू. २५,००,०००/— (रूपये पंचवीस लाख मात्र) दिनांक २१/१२/२०१५ रोजी रोख स्वरूपात मिळाली.

मिळाले

रूपये.२५,००,०००/—

श्री. महेंद्र चंद्रकांत घरत

(प्रथम पक्षकार)

साक्षीदार :

१.

२.

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal / Director
Dr. G. D. Pol Foundation
Y.M.T. Homoeopathic Medical College
P. G. Institute Kharghar,
Navi Mumbai - 410 210

Dr. (Mrs.) P. P. Page
Principal/Director
Dr. G. D. Pol Foundation's
Y.M.T. Homoeopathic Medical College
P.G. Institute, Kharghar,
Navi Mumbai-410210